पुढारी

# रोह्यात कृषी विज्ञान केंद्रातर्फे आदिवासी मेळावा

## महिलांना दिले पोषण आहाराचे धडे



**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कृषी विज्ञान केंद्र किल्ला यांच्यावतीने पोषण आहाराविषयी जागरुकता व शेतीपुरक व्यवसाय या विषयावर आदिवासी महिला शेतकरी मेळावा सोमवारी मढाली बु. येथील आदिवासीवाडीवर आयोजित करण्यात आला.

यावेळी डोलवहाळ माजी सरपंच चंदर कोळी, शिल्पा शिरवाडकर, कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषतज्ज्ञ डॉ. प्रमोद मांडवकर, मार्गदर्शक जीवन आरेकर, मार्गदर्शक माधव गित्ते, आदिवासी वाडीवरील प्रतिष्ठीत नागरीक राम कोळी, विकास कोळी, स्नेहवर्धिनी ट्रस्ट रोहाच्या सुप्रिया झोलगे, राजश्री तळकर, अंगणवाडी सेविका सुरेखा धामणसे, शालेय शिक्षक कदम, मुजमुले हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलीत करून करण्यात आली. विद्यार्थीनी प्रियांका कोळी व तिच्या सहकाऱ्यांनी शेतकरी गीत सादर करून उपस्थितांचे स्वागत केले.

विशेष अतिथी म्हणून मार्गदर्शन करताना शिल्पा शिरवाडकर यांनी, शासनाच्या आदिवासी शेतकरी व महिलांच्या विकासाकरिता राबवित असलेल्या योजनांची माहिती दिली. तसेच महिला बचतगट यांच्याकरिता असलेल्या स्वयंरोजगारविषयी मार्गदर्शन केले. डॉ. प्रमोद मांडवकर, पोषण आहारसंबंधी विवेचन करून सुधारीत कृषी तंत्रज्ञानाविषयी, आदिवासी अपयोजनेअंतर्गत कृषी विज्ञान केंद्राने केलेल्या उपक्रमांची माहिती दिली व पुढील हंगामात आदिवासी शेतकऱ्यांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. तांत्रिक सत्रामध्ये मार्गदर्शन करताना जीवन आरेकर यांनी पोषण आहाराविषयी शेतकरी महिलांचे आरोग्य, विद्यार्थ्यांचे शिक्षण तसेच तरुणांचा शेतीमधील सहभाग याविषयी मार्गदर्शन केले. माधव गीत्ते यांनी मत्स्यशेतीविषयी शेतकऱ्यांना माहिती दिली. मत्स्य मुल्यवर्धन विषयी प्रशिक्षणामध्ये सहभाग घेण्याचा आवाहन केले.